<u>नियमित दिवाणी मुकदमा नंबर २२१/२०१६ मधील नि.१९ वरील आदेश</u>

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज देवून कैफियत देण्यास त्यांना झालेला उशिर माफ व्हावा अशी विनंती केली. कैफियतीस आवश्यक कागदपत्रे आणि माहिती वेळेत मिळाली नसल्याने सदरचा उशिर झाल्याचे त्यांनी नमुद केले.

२. वादीने या अर्जावर आक्षेप घेवून असे नमुद केले की, दिनां २७/१०/२०१७ रोजी वादी या कामी हजर झाला. तेव्हापासून त्याने कैफियत दिली नसल्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा.

३. याकामी प्रतिवादी हजर झाल्यानंतर त्याने कैफियत देण्यासाठी जवळपास तीन महिन्यांचा विलंब लावला आहे. प्रतिवादींनी कैफियतीसोबत कोणतेही कागद दाखल केलेले नाहीत. त्यामुळे नेमके कोणते कागद मिळण्याकरता प्रतिवादींना विलंब झाला हे समजुन येत नाही.

४. मात्र कैफियत दाखल न झाल्यास प्रतिवादी यांना या दाव्यामध्ये आपला बचाव मांडता येणार नाही ही बाब ध्यानात घेता त्यांना अशी संधी देण्यात येते. याकरिता कैफियत नाही असा आदेश रक्कम रूपये ५००/— इतकी नुकसान भरपाई वादीस प्रतिवादीने दयावी या अटीवर मंजूर करण्यात येतो तसेच कैफियतीसोबत प्रतिवादीने सगळी कागदपत्रे सादर करावीत असेही त्यास आदेशीत करण्यात येते.

दिनांक : १८/०७/२०१८

सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.
Name of Stenographer :- R.G. Rahate
Court Name :- Joint Civil Judge, S.D., Ratnagiri
Date of order :- 18.07.2018
Order signed by P.O. on :- 18.07.2018
Order uploaded on :- 19.07.2018